करोनाच्या उद्रेकामुळे आसारामबापू तुरुंगात घाबरतोय

नवी दिल्ली दि. ३० : करोनाच्या उद्रेकामुळे देशभरातील अनेक तुरुंगातील कैद्यांना पेरोलवर सोडण्याच्या निर्णयानंतर आता राज्यसभा खासदार सुब्रमण्यन स्वामी यांनी आसाराम बापूच्या सुटकेचीही मागणी केली आहे. अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी दोषी सिद्ध झाल्यानंतर तुरुंगाची हवा खाणाऱ्या आसारामच्या वयाचा दाखल देत सुब्रमण्यन स्वामी यांनी त्यांच्या सुटकेची मागणी केली आहे. देशभरात करोनाच्या संसर्गामुळे हजारो कैद्यांना सोडण्यात येत आहे. आसाराम बापूचे समर्थक देखील सोशल मीडियावर त्यांच्या सुटकेचे आवाहन करत आहेत. करोना विषाणूमुळे आतापर्यंत २९ लोकांचा जीव गेला असून १,०७१ लोकांना त्याची लागण झाली आहे.

हिंदुस्थान

कोरोनाच्या निमित्ताने जगणं सुंदर करणाऱ्या टीप्स

संवादाची गरज

माणसाला संवादाची गरज असते....! का...? कशासाठी...? समजा कुकरमध्ये खूप वाफ कोंडली आहे. तिला बाहेर पडायला वाव मिळाला नाही. तर काय होईल...? कुकरचा स्फोट होईल. समजा एखाद्या डबक्यात पाणी साठलं आहे. आत येणारा झरा नाही. बाहेर जाणारा मार्ग नाही. तर काय होईल. आतलं पाणी आतल्या आत कुजून जाईल. वास येऊ लागेल. दुर्गंधी येऊ लागेल.

मनाचंही असंच असतं. विचारांची देवाणघेवाण झाली नाही. भावनांना वाट मिळाली नाही. की मनात विकृती निर्माण होते. अन यासाठी गरज असते संवादाची! अन्न, वस्त्र आणि निवारा या शरीराच्या मूलभूत गरजा असतील तर संवाद ही मनाची मूलभूत गरज आहे.

संवादाचा अभाव हे माणसांमाणसांत दुरावा निर्माण होण्याचं एक महत्वाचं कारण आहे. एकाच घरात राहणारे भाऊबहीण, पतीपत्नी, पितापुत्र यांच्यात संवाद नसतो. आपली सुखदुःख, भावना, विचार यांची देवाणघेवाण करायला वाव नसतो. काय गंमत आहे बघा, संवादाच्या खिडक्या बंद करून माणसं 'सहजीवन' जगत असतात. मग काय होतं, मनाच्या बंद तळघरात गैरसमजाचा राक्षस जन्माला येतो आणि बघता बघता तो अक्राळविक्राळ रुप धारण करतो. संवादच संपला की उरतो तो वाद...

संवाद म्हणजे नुसतं बोलणं नव्हे. संवाद म्हणजे विचारांची देवाणघेवाण. दुसऱ्याकडे विचार व्यक्त करण्याची माणसाला जशी गरज असते तशी दुसऱ्याचे विचार ऐकून घेणे ही सुद्धा मनाची गरज असते. या विचारांच्या देवाणघेवाणीने आपल्या विचारांना नवा आयाम मिळतो. आपल्या सुजनशीलतेला नवे पैलू पडतात. आपल्या ज्ञानात भर पडते. आपल्या व्यक्तिमत्त्वाचं, आपल्या उणिवांचं आपल्याला मूल्यांकन करता येतं. आपलं मानसिक आरोग्य सुदृढ रहातं. थडक्यात काय तर संपन्न व्यक्तिमत्त्वासाठी निरोगी मन आवश्यक आहे आणि निरोगी मनासाठी संवादाची गरज आहे.

तेव्हा बोलू लागा... ऐकू लागा... समजू लागा... संवाद साधू लागा...! कोरोनाच्या निमित्ताने माणसांमाणसांमधला कुंठित झालेला संवाद जर पुन्हा सुरू झाला, गैरसमज दूर झाले, नाती जोडली गेली, असलेली नाती वृद्धिंगत झाली तर जगावर आलेल्या काळ्या सावटाची ती रुपेरी किनार ठरू शकेल.

चला, नात्यांमधला संवाद पुन्हा सुरू करूया.

● प्रसाद कुलकर्णी
मोटीव्हेशनल स्पिकर, मुंबई
मो. ९९६९०७७१३३

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गरज भासल्यास तात्पुरत्या कम्युनिटी किचनची सुविधा

अमरावती दि. ३० : लॉकडाऊनच्या कालावधीत विस्थापित झालेले मजूर, बेघर व्यक्ती यांच्यासाठी नजीकच्या जिल्हापरिषद अथवा महानगरपालिका शाळा व विद्यालये, सार्वजनिक मैदाने, समाज मंदिर, खाजगी मंगल कार्यालये, धार्मिक प्रार्थना स्थळे अथवा संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील लिलावगृहे, औद्योगिक वसाहती, इत्यादी ठिकाणी आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरूपात कम्युनिटी किचन सुरू करावीत, असे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.

प्रत्येक कम्युनिटी किचनमध्ये आवश्यकतेप्रमाणे भांडी, स्वयंपाकासाठी आवश्यक असणारे साहित्य, पाणी उपलब्ध करुन द्यावे. कम्युनिटी किचनमार्फत अन्न तयार करणाऱ्या व्यक्तींना अथवा समुहाला आवश्यक अन्नधान्याचा पुरवठा हा स्वयंसेवी संस्था व इतर स्वयंसेवींमार्फत एकत्र करण्यात आलेल्या अन्नधान्यातून किंवा राज्य आपत्ती प्रतिसाद निधीव्दारे उपलब्ध झालेल्या निधीमधून करण्यात येईल. या सोयी सुविधांपासून कोणतीही गरजू व्यक्ती वंचित राहणार नाही याची खातरजमा करण्यात येणार आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये उपरोक्त सर्व बाबींचे नियोजन वॉर्डनिहाय सहाय्यक आयुक्तांमार्फत करून घेण्यात येणार आहे. तसे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व त्यासंदर्भात तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी राज्य आणि जिल्हास्तरावर नियंत्रण कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. लॉकडाऊनमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत गरजूंना निवारागृह, पाणी, अन्नधान्य तसेच भोजन व्यवस्था आणि वैद्यकीय सेवा अशा सुविधा स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने उपलब्ध करून देण्यासाठी या समित्या त्यांच्या स्तरावर नियंत्रणाचे काम करतील. राज्य शासनाने याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

मुख्य सचिव हे राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष आहेत. अपर मुख्य सचिव (महसूल), अपर मुख्य सचिव (नगरविकास), प्रधान सचिव (अन्न व नागरी पुरवठा), प्रधान सचिव (सहकार), प्रधान सचिव (कामगार) हे सदस्य असून आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन हे सदस्य सचिव आहेत.

जिल्ह्यातील महानगराचे क्षेत्र वगळता अन्य भागासाठी जिल्हाधिकारी स्तरावर तर शहरी भागासाठी महानगरपालिकास्तरावर समित्या असतील. कोरोना प्रतिबंध व लॉकडाऊन कालावधीत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व उपाययोजनांचे नियोजन करणे व निर्णयांची अंमलबजावणी करणे आणि सनियंत्रण ठेवणे यासाठी समित्या काम करतील.

लॉकडाऊनच्या कालावधीत अडकलेल्या मजूर, विस्थापित व बेघर व्यक्तींना आवश्यकतेनुसार निवारागृह, अन्न, पाणी आणि वैद्यकीय देखभाल आदी सुविधा देण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांची राहणार आहे. शहरी भागासाठी महानगरपालिका व जिल्हाधिकारी यांच्या समित्या संयुक्तरित्या काम करतील. जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती व महानगरपालिकास्तरीय सनियंत्रण समिती या दोन्हीही समित्या राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या अंतर्गत काम करतील.

जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीचे कामकाजही निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील विविध भागांमध्ये विविध घटकांतील जीवनावश्यक सुविधांपासून वंचित मजूर, विस्थापित व बेघर यांची यादी निश्चित करणे, त्याप्रमाणात अन्नधान्याची आवश्यकता व उपलब्धता याचा तपशील ठरविणे, मदत देण्यासाठी स्वयंसेवी संस्था, खाजगी संस्था, धर्मादाय संस्था, सहकारी संस्था तसेच सीएसआरमधून निधी उपलब्ध करून देणाऱ्या खाजगी कंपन्या यांची यादी तयार करणे, शिजवलेले अन्न वितरित करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करणे आदींचा समावेश आहे.

जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांच्याही जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये गरजूंना तात्पुरती निवारागृहे उपलब्ध करून देणे; शाळा, महाविद्यालये, समाजमंदिर, मंगल कार्यालय व इतर निवासयोग्य सभागृहे अशी योग्य ठिकाणे निवडून प्राधान्याने जिल्ह्याच्या मुख्यालयी व आवश्यकतेनुसार इतर सर्व ठिकाणी स्थानिक पातळीवर विशेषतः औद्योगिक वसाहतीजवळ तात्पुरत्या राहण्याची सोय करणे, ऊसतोड कामगारांकरिता संबंधित साखर कारखान्यांनी कामगारांची व्यवस्था करणे, त्यांना अडचणी आल्यास जिल्हाधिकारी अथवा महानगरपालिका आयुक्त सहाय्य करतील, सर्व महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावर हेल्पलाईन तयार करुन ती जाहिर करावी, या जबाबदाऱ्यांचा समावेश आहे.

घराबाहेर पडू नका, काळजी घ्या : ना. बच्चू कडू यांचे आवाहन

अमरावती, दि. ३० : अमरावती जिल्ह्यात कोरोना विषाणू संसर्गबाधित आतापर्यंत एकही रुग्ण आढळला नाही. मात्र, प्रत्येकाने दक्षता घेणे आवश्यक आहे. कुठलीही लक्षणे दिसली तर तपासणी करून घ्या. घराबाहेर पडू नका. आरोग्य यंत्रणेच्या सूचनेचे काटेकोर पालन करा. मी स्वतःला होम क्वारंटाइन करून घेतले आहे. आपणही घराबाहेर पडू नका, असे कळकळीचे आवाहन जलसंपदा राज्यमंत्री बच्चूभाऊ कडू यांनी केले आहे.

राज्यमंत्री श्री. कडू म्हणाले की, कुठलीही लक्षणे आढळल्यास तत्काळ तपासणी करून घ्यावी. मला सर्दी, ताप, खोकला झाल्यावर मी तत्काळ तपासणी करून घेतली. रिपोर्ट निगेटिव्ह आला आहे. त्यात घाबरून जाण्यासारखे काहीही नाही. दक्षता म्हणून सर्वांनी आरोग्य यंत्रणेच्या सूचनांचे पालन करावे. मी स्वतःला 'होम क्वारंटाईन' करून घेतले आहे. सर्वांनी स्वतःची व इतरांचीही काळजी घ्यावी. घराबाहेर पडू नये, असे आवाहन राज्यमंत्री महोदयांनी केले आहे.

शासनाकडून कोरोना संसर्ग प्रतिबंधासाठी सर्वतोपरी प्रयत्न होत आहेत. नागरिकांनीही स्वयंशिस्त पाळावी. सर्वांनी मिळून या संकटाचा यशस्वीपणे मुकाबला करूया, असे आवाहन त्यांनी केले.

सहज सुचलं म्हणून....

काल परत एकदा शाळकरी लहानपण एन्जॉय केलं. शाळेत असताना हा मोसम म्हणजे परिक्षा आणि निकाल ह्याचा असतो. वर्षभर प्रत्येक जण आपापल्या परिने मेहनत घेतो,प्रश्नपत्रांचा सराव करतो.जीवतोडून प्रगती साठी प्रयत्न करतो.मनातल्या मनात अंदाज बांधतो.यशाचे मनातल्या मनात इमले रचतो.त्यावेळी तयारी झाली असली तरी एक बेचैनी,हुरहूर अनुभवतो कधी परिक्षेत अपेक्षित यश मिळाले तर कौतुकाचे धनी होतो,थोडक्याने यश हुकले तर थोडे हळहळून परत प्रयत्न करायला सज्ज होतो,आणि बरेच मागे असलो तरी नैराश्य झटकून परत फिनिक्स पक्षागत उंच झेप घेण्याचा मनोमन निश्चय करतो. लागलेली ठेच ही संधी समजून परत जुन्या चुका सुधारून चेव आल्यासारखे पुढील वर्षाचे टारगेट पूर्ण करायचा मनोमन निश्चय करतो.हे आमचं दरवर्षी असतं तसं मार्च एंडिंग चे गणित.

या वर्षी हे सगळे अनुभव मार्च एन्डींग एकदम बदलले.पूर्ण तयारीनिशी परिक्षेत पेपर सुरु व्हायच्या नुकतच आधी परिक्षा आहे तशी गुंडाळून तीन महिन्यांनतर परत फेर परिक्षा असल्यागत वाटलं. ह्या वर्षीच्या बँकींग च्या क्लोजींग समयी न भुतो न भविष्यति असे अनुभवायला मिळालेले हे क्षण.

● कल्याणी बापट
अमरावती

८९) श्री ललिता पंचरत्नम्- ४

प्रातः स्तुवे परशिवां ललितां भवानीं त्र्यन्तवेद्यविभवां करुणानवद्याम्।
विश्वस्य सृष्टि-विलय-स्थितिहेतुभूतां
विद्येश्वरीं निगमवाङ्मनसातिदूराम्।।४।।

प्रातः स्तुवे - प्रातःकाळी अर्थात सूर्योदयाच्या देखील पूर्वी, डोळे देखील उघडण्याच्या आधी, मी स्तुती करतो.

परशिवां- पर म्हणजे अत्यंत श्रेष्ठ. शिव म्हणजे अत्यंत पवित्र. अत्यंत श्रेष्ठ आणि पवित्र असणारी.

ललितां- अत्यंत लालित्यपूर्ण असणारी.

भवानीं- भव म्हणजे भगवान शंकर. त्यांची चैतन्यशक्ती ती भवानी.

त्र्यन्त- कोणत्याही वेदांचे संहिता, आरण्यक, ब्राह्मण आणि उपनिषद असे चार भाग असतात. उपनिषद हा चौथा भाग असल्याने त्याला, तीनच्या नंतर असणारा म्हणून त्र्यन्त म्हटले. अर्थात त्र्यन्त म्हणजे उपनिषद ,वेदान्त.

वेद्यविभवां- वेद्य म्हणजे स्पष्ट करण्याचे, जाणवून देण्याचे. तर विभव म्हणजे वैभव .

अर्थात वेदांत तत्वज्ञानी जिचे वैभव स्पष्ट करते अशी. त्याद्वारे जिला जाणता येते अशी.

करुणानवद्याम्- करुणा अर्थात दया. अनवद्या अर्थात निर्दोष. सामान्य व्यवहारात दये मध्ये समोरच्याला आपल्यापेक्षा हीन समजणे आणि त्याच्यावर उपकार करणे. हा भाव असतो. तो दोष नसलेली दया म्हणजे वात्सल्याने आई परिपूर्ण असते.

विश्वस्य - विश्वाच्या. सृष्टि-निर्मिती.
विलय- प्रलय, विनाश.
स्थिति- संचालन.
हेतुभूतां - या सगळ्याचे मूळ कारण असणारी.

विद्येश्वरीं- सर्व प्रकारच्या विद्या अर्थात ज्ञानाचे अधिष्ठान असणारी. निगम- वेदादि शास्त्रे, वाङ्मनसा- वाणी आणि मनाने

विदूराम्- प्राप्त होणे असंभव असलेली.

अशा आई ललितांबेचे मी स्तवन करतो.

संचारबंदीमध्ये कृषी क्षेत्राशी निगडीत आस्थापने सुरू राहणार

अडकलेले मजूर व गरजू नागरिकांची व्यवस्था प्रशासनातर्फे

यवतमाळ,दि ३० : कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपात्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात व जिल्ह्यात साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४ ची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. तसेच सर्वत्र संचारबंदी लागू करण्यात आली आहे. मात्र या काळात कृषी क्षेत्राशी निगडीत आस्थापने सुरू ठेवण्याचे आदेशित केले आहे.

यात कृषी उत्पादने खरेदी करणाऱ्या कंपन्या एमएसपी ऑपरेशनसह सुरू राहतील. कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या मंडी किंवा महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेल्या मंडी, रासायनिक खतांची दुकाने सुरू राहतील. शेती करणारे शेतकरी किंवा शेतमजूर यांना शेती करण्याकरिता मुभा राहील. शेती करीता उपयोगात येणारे भाडेतत्वावरील अवजारे वाहतूक करता येईल. रासायनिक खते, किटकनाशके, बी-बियाणे बनविणारी व पॅकिंग करणारी युनीट सुरू राहतील. शेतमालाची काढणी व पेरणी करणाऱ्या मशीन्स जसे कंबाईन हार्वेस्टर आणि इतर कृषी अवजाराची राज्यांतर्गत व आंतरराज्य वाहतूक सुरू राहील.

केंद्र व राज्य सरकारतर्फे लॉकडाऊनचे आदेश पारीत झाले असतांना सुध्दा काही भागात मोठ्या प्रमाणात नागरिक त्यांच्या मूळ गावी स्थलांतरित होत आहे. त्यामुळे सामाजिक अंतर ठेवण्याबाबतचे लॉकडाऊन आदेशाचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे अडकलेले मजूर, गरीब लोक, आणि गरजू नागरिकांची तात्पुरती राहण्याची व खाण्याची व्यवस्था स्थानिक प्रशासनाकडून करण्यात यावी. जे नागरिक त्यांच्या मूळ गावी पोहचले आहे त्यांची आरोग्य विभागाकडून योग्य तपासणी करून त्यांना विलगीकरणाची सोय उपलब्ध करून द्यावी व आरोग्य नियमानुसार त्यांना १४ दिवस विलगीकरण कक्षात ठेवण्यात यावे. औद्योगिक क्षेत्र, दुकाने किंवा वाणिज्य आस्थापना लॉकडाऊनच्या कालावधीत बंद असली तरी येथे काम करीत असलेल्या कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी कोणतीही कपात न करता मजुरी देण्यात यावी. तसेच त्यांना कामावरूनसुध्दा काढून टाकण्यात येऊ नये. जे कामगार स्थलांतरीत कामगारांसह भाड्याच्या घरात राहत आहे, त्यांच्याकडून घरमालकांनी एक महिन्याकरिता घरभाड्याची मागणी करू नये. जर अशा घरमालकाने कामगारांना किंवा विद्यार्थ्यांना त्यांचे घर खाली करण्याबाबत जबरदस्ती केल्यास त्यांच्याविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येईल.तसेच भारत सरकारचे गृहसचिव यांनी आदेशित केले आहे की, सर्व मालाच्या वाहतुकीला अत्यावश्यक आणि अत्यावश्यक नसलेला असा भेदभाव न करता परवानगी देण्यात येत आहे. पोट कलम २ (ग) अंतर्गत अपवाद असलेल्या पेंशनमध्ये ईपीएफओ ने पुरविलेल्या पेंशन व भविष्य निर्वाह निधी याचा समावेश होतो. कलम ३ अंतर्गत इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या सेवांचासुध्दा अंतर्भाव करण्यात आला आहे. किराणा सामानामध्ये स्वच्छतेच्या वस्तु जसे हॅन्डवॉश, साबण, जंतुनाशक, बॉडीवॉश, शॅम्पू, सरफेस क्लिनर, डीअर्जट, टिश्यु पेपर, टुथपेस्ट, सॅनिटरी पॅडस, बॅटरी सेल व चार्जर यांचा समावेश होतो. दुधाचा संग्रह व वितरण करण्याची संपूर्ण साखळी त्याच्या पॅकिंग मेटरिअलसह परवानगी देण्यात येत आहे. प्रिंट मिडीया अंतर्गत वर्तमानपत्रे वाटप करण्याच्या साखळीस परवानगी देण्यात येत आहे.

वरील आदेशाचे उल्लंघन करणाऱ्याविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४, भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ च इतर संबंधित कायदे व नियम यांच्या अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाच्यावतीने पारीत करण्यात आले आहे.

का असे ?

आज माझ्या स्पंदनांना फास कां पडले असे?
दक्ष माझ्या भावनांचे श्वास कां झडले असे?

जाणली कोणी? भुकेची काय असते आग ही
आज माझ्या भोजनाचे घास कां अडले असे?

दुखविले जर ना कुणाला आजवर येथेच मी
बाळ माझ्या सभ्यतेचे आज कां रडले असे?

पिंजऱ्याच्या चौकटीला सोडले ना मी कधी
जीवनाला आज कारावास कां नडले असे?

यौवनाच्या उंबरी मी राहिलो बघ एकटा
सांजकाळी जीवनी मग घ्यास कां जडले असे?

● अनिल जाधव
अमरावती, मो. ९४२२८५७०६०

ग्रामीण भागात कायद्याची पायमल्ली कठोर कारवाई व्हावी असेच सुज्ञ नागरिकांची मागणी

(अनंत बोबडे)

येवदा दि. ३० : कोरोना एवढी भयानक स्थिती असतानासुद्धा प्रशासन राबराब राबून कोरोना विषाणूजन्य प्रादुर्भावापासून वाचण्याकरिता शर्तीचे प्रयत्न करीत आहे परंतु लोक मात्र एवढ्या भयानक स्थितीला नार्मल समजून कायद्याची पायमल्ली करत असल्याचे दिसत आहे आज सकाळी येवदा येथील महाराष्ट्र बँक उघडताच बँकेसमोर शेकडो लोक गर्दी करत असल्याचे दिसून आले याबाबत पोलिसांना माहिती कळताच पोलिसांनी सुद्धा घटनास्थळी धाव घेतली परंतु पोलीस निघून जाताच परिस्थिती जयशेती दिसून येत आहे आठवडी बाजार किराणा दुकान अशा ठिकाणी लोकांनी गर्दी करण्यास सुरुवात केली आहे एसपी साहेबांनी जनतेसोबत कठोर वागणूक न करण्याचे आदेश दिल्यामुळे लोकांनी त्याचा फायदा उचलला आहे अशी स्थिती येवदा वडनेर गंगाई पिंपळोद उमरी परिसरातील सर्व खेडोपाडी दिसून येत आहे प्रशासनाने पुन्हा कडक कारवाई करावी असे समजूत जनतेकडून बोलले जात आहे शासनाने जनतेच्या हिताकरिता एवढे मोठे पाऊल उचलून सुद्धा जर अशी स्थिती राहिली तर लॉक डाऊन चे काही फायदा होणार नसल्याचे दिसून येत आहे तरी शासनाने ग्रामीण भागात कठोर कारवाई केल्याशिवाय पर्याय नाही येवदा गाव मध्ये बाहेरगावावरून जवळपास शेकडो लोक गावामध्ये फिरते काही लोकांनी आपली वैद्यकीय तपासणी करून घेतली तर काही लोक अद्यापही घरातच बसून असल्याचे समजते त्यांनी तातडीने त्यांनी तातडीने दवाखान्यामध्ये जाऊन तपासणी करावी असे सुद्धा जनतेमध्ये बोलले जात आहे

येवदा ठाणेदार बाळकृष्ण पावरा व दुय्यम ठाणेदार प्रणील पाटील

कायद्याच्या चौकटीत राहून कायद्याचे पालन करणे हे सर्व जनतेचे काम आहे तुमच्या सहकार्याशिवाय आम्ही काहीच करू शकत नाही जर जो कोणी कायद्याचे उल्लंघन करत असेल तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल जनतेला कुठलीही समस्या आली तर त्यांनी त्वरित येवदा पोलीस स्टेशनचे संपर्क साधावा असे आव्हान येवदा ठाणेदार यांचेकडून करण्यात आले आहे

चिखलदरा कोरोनामुक्त ठेवण्याचा संकल्प

प्रादुर्भाव टाळण्याकरीता सर्वोतोपरी उपाय योजना सुरू

(अशरफभाई)

चिखलदरा दि.३० : सर्वत्र थैमान घालणाऱ्या कोरोनावर आळा घालण्याकरीता जिल्हा प्रशासन व आरोग्य यंत्रणा सर्वोतोपरी उपाय योजना राबवित आहे. या अभियानामध्ये विदर्भाचं नंदनवन असलेल्या चिखलदरा नगर परिषद यांच्या पुढाकारामध्ये स्थानिक व्यावसायीक व नागरीकांचे मोलाचे सहकार्य मिळत आहे.

मागील आठवड्यापासुन देशात लॉकडाऊन सुरू आहे. याची प्रभावी अंमलबजावणी चिखलदरा तालुक्यात सुद्धा त्याच पद्धतीने सुरू आहे. येथील ठाणेदार आकाश शिंदे, एपीआय विनायक लंबे व पोलीस कर्मचारी सर्वत्र जनजागृती करीत परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत. ग्रामीणस्तरावर पंचायत प्रशासन व कर्मचारी या अभियानाला सहकार्य करीत आहे. सध्या पिक हाती असल्याने शेतकरीवर्ग शेतात जाण्यास आतुर आहे. अशा परिस्थितीमध्ये त्यांना अडवता येत नसले तरी त्यांच्यातील सोशल डिस्टंट कायम राहण्यावर भर दिल्या जात आहे. त्याकरीत गावपातळीवर सरपंच, पोलीस पाटील व इतर कर्मचारी जनजागृती करीत आहेत.

नगरपालीकेचे मुख्याधिकारी सूर्यकांत पिद्दूरकर यांनी पर्यटकांवर येथे येण्यास पुर्णपणे बंदी घातली आहे. प्रामुख्याने शहरात येणाऱ्या प्रमुख व सर्व रस्त्यांवर चौकस नजर ठेवण्यात आली आहे. बाहेर काम करणाऱ्या मजुरांवर परत येण्याची बंदी घालता येत नसली तरी त्यांची योग्यवेळी वैद्यकीय तपासणी करण्यात येत आहे. त्यामुळे मागील पंधरा दिवसामध्ये एकही संक्रमीत रूग्ण आढळला नाही. सोबतच ग्रामीण व शहरामध्ये विषाणूनाशक फवारणी करण्यात येत आहे.

विदर्भाचं नंदनवन असलेल्या चिखलदऱ्याला कोरोना मुक्त करण्यासाठी नगराध्यक्ष विजया सोमवंशी, उपाध्यक्ष शे. अब्दुल नगरसेवक, वैद्यकीय अधिकक्ष डॉ. संजय पवार, वैद्यकीय कर्मचारीं, लोकप्रतिनिधी व नागरीकांचे सहकार्य मोलाचे ठरत आहे.

अमरावती विभागात नऊ हजारावर नागरिकांना निवारा केंद्रात आश्रय

अमरावती, दि. ३० : विविध प्रकल्पांवरील श्रमिक, प्रवास करताना अडकलेल्या कामगार, नागरिकांच्या निवारा, भोजन आदी सुविधांसाठी अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यात ६१ निवारा केंद्रे सुरु करण्यात आले आहेत. या निवारा केंद्रात आतापर्यंत नऊ हजार १०४ नागरिकांना आश्रय देण्यात आला आहे.

अमरावती जिल्ह्यातील १६ निवारा केंद्रात २ हजार ८३३, अकोला जिल्ह्यात सात निवारा केंद्रात ७६०, यवतमाळ जिल्ह्यात सात निवारा केंद्रात १ हजार ४६२, बुलडाणा जिल्ह्यात सर्वाधिक २७ निवारा केंद्रात ३ हजार ५११, तर वाशिम जिल्ह्यातील चार निवारा केंद्रात ५३८ नागरिकांची सोय करण्यात आली आहे, अशी माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाने दिली आहे. निवारा केंद्रात आश्रयासाठी गरजूंनी महापालिकांचे आयुक्त, तहसिलदार आणि नगर परिषदांच्या मुख्याधिकारी कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विस्थापित कामगारांच्या व्यवस्थेसाठी मुख्यमंत्र्यांनी केला ४५ कोटी निधी मंजूर

मुंबई दि.३० : कोरोना विषाणूंचा फैलाव रोखण्यासाठी तसेच लॉकडाऊनमुळे विस्थापित झालेले आणि परराज्यातील अडकलेल्या कामगारांच्या व्यवस्थेसाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या निदेशानुसार ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

विस्थापित कामगार यांच्यासाठी निवारा गृह, अन्नधान्य व भोजन तसेच इतर तातडीने करावयाच्या उपाययोजनांसाठी मुख्य सचिव अजोय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन राज्य कार्यकारी समितीची बैठक झाली, त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला.

विभागीय आयुक्त कोकण- रु. १५ कोटी, नागपूर- रु.५ कोटी, पुणे- रु.१० कोटी, अमरावती- रु. ५ कोटी, औरंगाबाद- रु. ५ कोटी, नाशिक- रु. ५कोटी, असा राज्यातील सर्व जिल्ह्यांना एकूण रु.४५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला.